जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
Address – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in Ph.020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - २८ दिनांक - १४/०१/२०२५

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन पुणे शहर

## अट्टल घरफोडया करणा-या सराईत आरोपीकडुन दोन घरफोडीचे गुन्हे उघड भारती विद्यापीठ पोलीसांची कौशल्यपुर्ण कामगिरी

दिनांक ०५/१२/२०२४ रोजी फिर्यादी यांचे राहते घरातुन दोन अनोळखी चोरटयांनी फिर्यादी यांचे घराचे दरवाजाचे कुलुप तोडुन आत प्रवेश करुन हॉलचे पोटमाळयावर ठेवलेली लोखंडी पेटीचे कुलुप कोंयडा तोडुन त्यातील १,००,०००/- रू.चोरुन नेले म्हणुन फिर्यादी यांनी दिले तक्रारीवरुन भारती विदयापीठ पोलीस स्टेशन,गुन्हा रजि नंबर १०२५/२०२४ भारतीय न्याय संहीता कलम ३३१(४),३०५,३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दाखल गुन्हयातील अनोळखी आरोपींचा शोध घेणेबाबतच्या वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री.डी.एस.पाटील यांनी तपास पथकाचे अधिकारी पोलीस उप निरीक्षक निलेश मोकाशी व पोलीस अंमलदार यांना सुचना दिल्या होत्या.त्यानुसार भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे तपास पथकाचे अंमलदार मितेश चोरमोले,अभिनय चौधरी,सागर बोरगे,महेश बारवकर हे शोध घेत असताना त्यांना सदरचा गुन्हा रेकॅार्डवरील आरोपी **जितेंद्र ऊर्फे जितु शंकर चिंधे,वय ३१ वर्षे,रा.काका पवार तालीमजवळ,जांभुळवाडी रोड,साईबाबा मंदीरा शेजारी,आंबेगाव बु,पुणे** याने केल्याची बातमी मिळाल्याने त्यांनी सदरचा आरोपीचा शोध घेत असताना तो जांभुळवाडी येथे मिळुन आल्याने त्यास नमुद गुन्हयात अटक केली आहे.

पोलीस कस्टडी दरम्यान आरोपी कडुन ६०,०००/-रु.किं.ची सोन्याची मोहनमाळ व ५०००/- रुपये रोख रक्कम जप्त केले असुन आरोपी कडुन वरील नमुद गुन्हा तसेच भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ८२९/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३३१(३),३०५ प्रमाणे असे दोन गुन्हे उघडकीस आले आहेत.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुकत,पश्चिम प्रादेशीक विभाग,पुणे,श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ २,श्रीमती स्मार्तना पाटील, मा.सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग,पुणे श्री.राहुल आवारे, यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशन कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.डी.एस.पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्रीमती संगीता देवकाते, श्री.राहुलकुमार खिलारे,तपास पथकाचे अधिकारी पोलीस उपनिरीक्षक निलेश मोकाशी, पोलीस अंमलदार मितेश चोरमोले,अभिनय चौधरी,सागर बोरगे,महेश बारवकर,सचिन सरपाले,चेतन गोरे,मंगेश पवार,निलेश खैरमोडे,सचिन गाडे,यांच्या पथकाने केली आहे.